बाब क्र. १

अधिसभा ३० व ३१ मार्च, २०१८

## मुंबई विद्यापीठ

University of Mumbai

दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता
झालेल्या अधिसभेच्या विशेष सभेचे इतिवृत्त

**Minutes of the Special Meeting of the Senate**

**held on 12th September, 2017 at 11.30 p.m.**

मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.१/२०१७-२०१८

अधिसभा
१२ सप्टेंबर, २०१७

अधिसभेची विशेष सभा विद्यापीठाच्या सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन येथे मंगळवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता सुरू झाली सभेमध्ये खालील सदस्य उपस्थित होते :—

१. डॉ. देवानंद बा. शिंदे (प्रभारी कुलगुरू) अध्यक्ष
२. डॉ. धिरेन पटेल (प्रभारी प्र—कुलगुरू)
३. श्री. अर्जुन घाटुळे (स्थानापन्न संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ)
४. श्री. भुजंग कि. अहिरे
५. डॉ. दिलीप शं. पाटील
६. डॉ. सुनिल पाटील
७. श्रीमती हुस्नबानू नि. खलिफे
८. अॅड. अनिल परब
९. डॉ. अनिल कर्णिक
१०. डॉ. पी. एम. डोंगरे
११. डॉ. (श्रीमती) मंजिरी कामत
१२. श्री. मच्छिंद्रनाथ र. डोईफोडे
१३. श्री. विजय तायडे (स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी)
१४. डॉ. दिनेश कांबळे (प्र. कुलसचिव) सदस्य सचिव

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

स्वागत :—

अधिसभेच्या कामकाजाला सुरुवात करताना कुलसचिवांनी स्वतःच्या व विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

अभिनंदन :—

अधिसभेच्या कामकाजाला सुरुवात करताना विद्यापीठास परिक्षेच्या लागलेल्या निकालात झालेल्या गोंधळाबाबत व परिक्षा—निकाल प्रकरणी विद्यार्थ्यांना येणा—या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी सन्माननीय कुलपतींनी डॉ. देवानंद शिंदे यांची प्रभारी कुलगुरु पदी, व्ही.जे.टी.आय.चे डॉ. धीरेन पटेल यांची प्रभारी प्र—कुलगुरु पदावर व

डॉ. अर्जुन घाटुळे यांची संचालक (परिक्षा व मुल्यमापन मंडळ) पदावर नेमणूक केल्याबद्दल व सर्व अधिसभा सदस्यांचे स्वागत व अभिनंदन केले.

विद्यापीठातील डॉ.दिनेश कांबळे, उपकुलसचिव यांना मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव पदाचा कार्यभार देण्यात आला. याबद्दल अधिसभा व इतर मान्यवर मंडळींनी त्यांचे स्वागत व अभिनंदन केले.

सर्व अधिसभा सदस्यांच्यावतीने डॉ. मंजिरी कामत यांनी डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरु), डॉ. धीरेन पटेल (प्र–कुलगुरु), डॉ. अर्जुन घाटुळे (संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ) व डॉ.दिनेश कांबळे (कुलसचिव) यांस पुष्पगुच्छ देवून सन्मानीत केले.

**श्रध्दांजली :–**

कुलसचिवांनी अलिकडच्या काळातील मान्यवर व्यक्तींच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन पुढील शब्दात भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

**श्री. गोविंद तळवलकर**

महाराष्ट्र टाईम्स दैनिकाचे माजी संपादक व व्यासंगी लेखक श्री.गोविंद तळवलकर यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९१ वर्षांचे होते.

**श्री. रमेश सोहानी**

साठये कॉलेजचे माजी प्राचार्य श्री. रामेश गोविंद सोहानी यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०२ एप्रिल, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८० वर्षांचे होते.

**प्रा. रामनाथ चव्हाण**

लेखक व नाटककार प्रा. रामनाथ चव्हाण यांचे आजाराने दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षांचे होते.

**श्री. विनोद खन्ना**

हिंदी चित्रपटसृष्टीतील जेष्ठ अभिनेते खासदार श्री. विनोद खन्ना यांचे दीर्घ आजाराने दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७० वर्षांचे होते.

**श्री. अनिल दवे**

केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री श्री. अनिल दवे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १८ मे, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६० वर्षांचे होते.

**श्रीमती रिमा लागू**

जेष्ठ अभिनेत्री श्रीमती रिमा लागू यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १८ मे, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ५९ वर्षांच्या होत्या.

**डॉ. के.सी.मोहंती**

श्वसनविकार तज्ज्ञ डॉ.के.सी.मोहंती यांचे दीर्घ आजाराने दिनांक ५ जून,२०१७ रोजी निधन झाले.

**श्री. मधू दळवी**

ज्येष्ठ रंगव्यवस्थाकार श्री. मधू दळवी यांचे ह्रदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० जून, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६६ वर्षांचे होते.

**श्री. ध्रुव घोष**

प्रख्यात सारंगी वादक पंडित ध्रुव घोष यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ५९ वर्षांचे होते.

**श्री मंगेश तेंडूलकर**

ज्येष्ठ व्यंगचित्रकार व नाटयसमीक्षक श्री. मंगेश तेंडूलकर यांचे अल्पशः आजाराने दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षांचे होते.

**श्रीमती उमा भेंडे**

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उमा भेंडे यांचे दीर्घ आजाराने दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या.

**श्री बद्रीनारायण बारवाले**

उद्योजक आणि स्वातंत्र्यसैनिक श्री. बद्रीनारायण बारवाले यांचे वृध्दापकाळाने दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**प्रा. यशपाल**

प्रसिध्द वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. यशपाल यांचे दीर्घ आजाराने दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. विजय खातू**

गणेश मूर्ती घडवणारे प्रसिध्द मूर्तिकार श्री. विजय खातू यांचे ह्रदयविकाराच्या झटक्याने दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६३ वर्षांचे होते.

**श्री. इंदर कुमार**

ज्येष्ठ अभिनेता श्री. इंदर कुमार यांचे ह्रदयविकाराच्या झटक्याने दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ४४ वर्षांचे होते.

**उस्ताद सईदुद्दीन डागर**

ख्यातनाम गायक उस्ताद सईदुद्दीन डागर यांचे अल्पशः आजाराने दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७८ वर्षांचे होते.

**श्री. संतोष मोहन देव**

माजी केंद्रीय मंत्री श्री. संतोष मोहन देव यांचे दिर्घ आजाराने दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**डॉ. भीमराव गस्ती**

ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते डॉ. भीमराव गस्ती यांचे अल्पशः आजाराने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**श्री. श्रीराम मंत्री**

शिक्षणतज्ञ आणि लेखक श्रीराम मंत्री यांचे वृध्दापकाळाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**श्री. सीताराम पांचाळ**

अभिनेते श्री. सीताराम पांचाळ यांचे कर्करोगाने दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ५४ वर्षांचे होते.

**श्री. चिं. त्र्यंबक येवलेकर**

शिक्षणमहर्षी श्री. चिंतामण त्र्यंबक येवलेकर यांचे दीर्घ आजाराने दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**श्री. पद्माकर आ. पुरोहित**

आदर्श शिक्षक श्री.प.आ. पुरोहित यांचे दीर्घ आजाराने दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ९१ वर्षांचे होते.

**श्रीमती शिरीष पै**

जेष्ठ कवयित्री श्रीमती शिरीष पै यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या.

**श्री. संभाजीराव म्हसे पाटील**

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. संभाजीराव म्हसे पाटील यांचे पोटाच्या विकाराने दिनांक ०२ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**श्री. पद्माकर कार्येकर**

ज्येष्ठ पत्रकार आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी कोषाध्यक्ष श्री. पद्माकर कार्येकर यांचे हृदयविकाराने दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७४ वर्षांचे होते.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने अधिसभेच्या कामकाजाला सुरुवात झाली.

**बाब क्र.१: दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

सदस्य सचिवांनी कार्यक्रम पत्रिकेतील बाब क्र.१ अधिसभेपुढे मांडून दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त संमत करण्यापूर्वी त्यातील दुरुस्ती व सूचना सूचित करण्यास सांगितले. तसेच, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या अधिसभेच्या

सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त देखील मान्यतेसाठी ठेवण्यात आले.

विद्यापीठात परिक्षा निकालासंबंधीत येणा–या अडचणीमुळे सदर दोन्ही अधिसभेचे इतिवृत्त उशिरा आल्यामुळे कुलसचिवांनी दिलगिरी व्यक्त करुन पुढील काळात लवकरात–लवकर इतिवृत्त पाठविले जातील व सूचनांसह इतिवृत्त मंजूर करण्याची सभागृहाला विनंती केली.

अॅड. अनिल परब म्हणाले की, इतिवृत्त वेळेत आले असते तर त्याच वेळेस सूचना व दुरुस्ती सूचित करुन मान्य करता आले असते. श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी इतिवृत्त विना विलंब देण्याचे सूचित केले.

डॉ. मंजिरी कामत यांनी दिनांक १६ मार्च, २०१७ च्या इतिवृत्तात पान क्र.१७ वरील चौथ्या परिच्छेदामधील पहिल्या व दुस–या ओळीतील Statue ऐवजी "Statute" अशी दुरुस्ती सुचविली. सूचना व दुरुस्तीसह दिनांक १६ मार्च, २०१७ व दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ चे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

बाब क्र.२ **बाब क्र.२: शैक्षणिक वर्ष २०१८–१९ ते २०२२–२३ करिता अद्ययावत करून सादर केलेला बृहत आराखडा व सदस्यांच्या शिफारशीसह शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करिता वार्षिक आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३७ (१) (एच अॅन्ड आय), ७७, १०७, १०९, ११०, १११, ११२ आणि ११८ नुसार अंतीम मंजुरी व शासनाकडे पाठविण्याकरिता अधिसभेच्या विचारार्थ ठेवण्यात येत आहे.**

डॉ. मंजिरी कामत यांनी प्रस्ताव मांडला व त्याला डॉ. अनिल कर्णिक यांनी अनुमोदन दिले.

डॉ. मंजिरी कामत म्हणाल्या की, बृहत आराखडा तयार करताना प्रामुख्याने जिथे स्कील बेस, विशेष आवश्यकता किंवा महिला महाविद्यालये नसतील अशा ठिकाणी प्राधान्य दिले गेले आहे व बृहत आराखडा तयार केला आहे. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांची आवश्यकता मुंबई उपनगर दहिसर, ठाणे, मुरबाड, नवी मुंबई, पालघर, रायगड या क्षेत्रात कोणत्या ठिकाणी आहे, याबाबत माहिती घेऊन पुढील पाच वर्षात आपल्याला महाविद्यालयाची गरज कुठे आहे, हे प्रस्तावित करण्यात आले आहे.

बृहत आराखडयाविषयी बोलताना मा. कुलगुरु म्हणाले की, सदर बाबींमधील सूचना द्याव्यात व बिंदू दर्शवावा.

बृहत आराखडयाबाबत चर्चा करताना श्रीमती हुस्नबानू खलिफे

म्हणाल्या की, खेड व चिपळूणमधील अंतर ३० कि.मी. चे अंतर असून राजापूर व मंडणगड मधील अंतर हे २८० कि.मी. आहे. सदरील अंतर विचारात घेऊन ग्रामीण भागातील लोकांच्या शिक्षणाचा प्रश्न योग्य प्रकारे सोडविण्यासाठी रत्नागिरी जिल्हयात "खेड व चिपळूण" ऐवजी "रत्नागिरी ग्रामीण" भागात महाविद्यालय प्रस्तावित करावे, असे त्यांनी सुचित केले व ॲड अनिल परब यांनी सहमती दर्शविली.

बृहत आराखडा तयार करताना डॉ. नरेंद्र जाधव समितीने विद्याशाखा डोंगराळ भाग, ग्रामीण भाग, शहरी भागांसाठी वेगवेगळया दिनदर्शिका दिल्या आहेत. त्या मार्गदर्शिकेप्रमाणे समितीला काम करावे लागते, असे मा. कुलगुरुंनी स्पष्ट केले.

सदर मुद्यान्वये सविस्तर चर्चा होऊन रत्नागिरी जिल्हयात "ग्रामीण भाग" ही दुरुस्ती सुचविण्यात आली.

श्री. सुनिल पाटील यांनी ठाण्यामधील "मुरबाड" ऐवजी "ठाणे शहर वगळून" अशी दुरुस्ती सुचविली.

ॲड. अनिल परब म्हणाले की, दहिसरची लोकसंख्या, मेट्रोपोलीटन क्षेत्र ५ कि.मी.चा परिघ इत्यादी विचारात घेता डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या मार्गदर्शिका पाळल्या जात नाहीत. शहरी भागात पुरेशी महाविद्यालये असल्याने ग्रामीण भागात महाविद्यालये प्रस्तावित करावीत व मुंबई उपनगरामध्ये दहिसर विभाग रद्द करण्याची दुरुस्ती त्यांनी सुचविली.

मुंबई उपनगरामध्ये स्थापत्यशास्त्र (आर्किटेक्चर) (पदवीपूर्व) महाविद्यालयांचे उदा. बांद्रयातील रहेजा व रचना संसद महाविद्यालयांतील अंतर ५ कि.मी. च्या आत असल्याने बांद्रयापासून दहिसर पर्यंत व सायन पासून मुलूंड पर्यंत महाविद्यालये प्रस्तावित करावेत, अशी सूचना करण्यात आली. मुंबई पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे येथे प्रत्येकी एक महाविद्यालय असावे, असे त्यांनी सुचित केले.

तसेच, व्यवस्थापन महाविद्यालयांस (पदव्युत्तर) सध्या खुप मागणी असून सिंधुदूर्ग व रत्नागिरी या भागामध्ये व्यवस्थापन महाविद्यालये नसल्याने विद्यार्थ्यांना मुंबईला यावे लागते. यामुळे सिंधुदूर्ग व रत्नागिरी इथे प्रत्येकी एक व्यवस्थापन महाविद्यालय प्रस्तावित करावेत, असे त्यांनी सांगितले.

श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी सिंधुदूर्ग व रत्नागिरी मध्ये प्रत्येकी एक महाविद्यालये असावीत अशी सहमती दर्शविली.

श्री. दिलीप पाटील यांनी बृहत आराखडयाच्या परिशिष्ट मध्ये अनुक्रमांक २० येथे अभ्यासक्रम विषयाचा तपशील मधील अनुक्रमांक २० मध्ये and च्या ऐवजी / आणि Activities ऐवजी work अशी दुरुस्ती सुचविली.

डॉ. मंजिरी कामत यांनी परिशिष्ट मधील अभ्यासक्रम व विषयाचा मुद्दा क्र. १८ मध्ये "Actural" च्या ऐवजी "Acturial" असावे अशी दुरुस्ती सुचविली.

सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सूचनांचा विचार करता सर्वानुमते बृहत आराखडा मंजूर करण्यात आला व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला :—

ठराव : विद्वत परिषदेच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ च्या बैठकीत बाब क्र. ३.३ अन्वये ठेवण्यात आलेल्या बृहत आराखडयाबाबत असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०१८–१९ ते २०२२–२३ करिता अद्यावत करुन सादर केलेल्या बृहत आराखडयाला अधिसभेच्या सदस्यांनी सुचविलेल्या खालील दुरुस्ती व सूचनासह शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करिता वार्षिक आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात आले :—

*मुंबई विद्यापीठ*
*शैक्षणिक वर्ष २०१८–१९ या वर्षाकरिता बृहत आराखडयानुसार नवीन महाविद्यालये (पदवीपूर्व व पदव्युत्तर) निश्चित केलेले स्थान*

१)

| अ. क्र. | विद्याशाखा / महाविद्यालयाचा प्रकार | स्थान | दुरुस्ती / सूचना |
|---|---|---|---|
| १. | कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांचे महाविद्यालय (पदवीपूर्व) | मुंबई उपनगर दहिसर विभाग | दहिसर विभाग रद्द करणे. |
| | | ठाणे– मुरबाड | ठाणे शहर वगळून |
| | | खेड ते चिपळूणमध्ये ग्रामीण | रत्नागिरी ग्रामीण भाग |
| ८. | स्थापत्यशास्त्र (आर्किटेक्चर) (पदवीपूर्व) महाविद्यालय | ..... | मुंबई पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरे येथे प्रत्येकी एक महाविद्यालय असे दोन महाविद्यालये सुचविले. |
| १० | व्यवस्थापन (पदव्युत्तर) महाविद्यालय | ..... | रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे प्रत्येकी एक महाविद्यालय असे दोन महाविद्यालये सूचित केले. |

२) परिशिष्ट :—

i) बृहत आराखडयाच्या अभ्यासक्रम/विषयाचा तपशीलामधील अनुक्रमांक २० मध्ये and च्या ऐवजी / आणि Activities च्या ऐवजी **work** असे वाचावे.

ii बृहत आराखडयाच्या अभ्यासक्रम/विषयाचा तपशीलामधील अनुक्रमांक १८ मध्ये Actural च्या ऐवजी Acturial असे वाचावे.

ॲड. अनिल परब यांनी निकालासंदर्भात घातपातीचा काय प्रकार आहे, याबद्दल माहिती विचारली.

संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी खालीलप्रमाणे निवेदन केले:—

विद्यापीठाच्या निकालासंदर्भात सद्याच्या स्थितीत आयडॉल आणि कॉमर्सचे ८ निकाल प्रलंबित असून ८ निकालामध्ये साधारण ५७ हजार विद्यार्थ्यांचे निकाल लवकरच लागतील. मुख्यत: अकाऊंटस् व टॅक्सेशनचे प्रमाण मोठे आहेत व त्यांचे मागील चार दिवसात चांगल्या प्रकारचे मुल्यांकन झाले आहेत; तेही चार—पाच दिवसात पूर्ण हाईल. जे निकाल जाहिर झाले आहेत, त्यातील २५ हजार निकाल प्रलंबित आहेत. काही उत्तरपत्रिका वेगळया गठ्ठयात विस्थापित झाल्या आहेत; ज्याला आपण 'मिसप्लेस' म्हणतो, काही लॉजिकली मिसप्लेस म्हणजेच स्कॅन केल्यानंतर एका विषयाच्या उत्तरपत्रिका दुस—या विषयामध्ये मिसळल्या गेल्या त्यामुळे प्राध्यापक ते पूर्ण गठ्ठे तपासत नाहीत; जो पर्यंत त्या उत्तरपत्रिका परत येत नाही. फिजिकली शोधायचे काम सुरु असून ज्या लॉजिकली आहेत त्यांचे मुल्यमापन होत आहे. मिसप्लेसची संख्या १५० पर्यंत आहे.

मिसप्लेस उत्तरपत्रिकाबद्दल माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, एका महाविद्यालयाकडून इतिहासाचे एका दिवसाचे ३०० पेपर आले तेव्हा पेपर स्कॅन करताना ३०० ऐवजी कमी पेपर स्कॅन होणे किंवा स्कॅन न होताच पेपर गठ्ठयात राहून जाणे म्हणजेच इतिहासाच्या गठ्ठयात हिंदीचे पेपर जाणे. स्कॅनिंग व टॅगिंग मधल्या काही त्रुटी याचाच अर्थ असा की, हिंदीच्या प्राध्यापकांना इतिहासाचे पेपर जाणे इत्यादी. सुरुवातीला ओ.एस.एम. प्रक्रिया सुरु केली, त्यावेळेस जो डेटा इनपुट केला तो किती चोख होता, ते करताना काय टॅगिंग केले, त्याचा शोध वेगळया पध्दतीने घेतला जाईल. काय इनपुट दिले व दिलेल्या इनपुटप्रमाणे त्यांनी काम केले कि नाही. त्यांच्याकडून चूकले कि आपल्याकडून चूकले. बहुतांश प्रकार माहित असून त्याचे पुरावे गोळा करावे लागतील. सद्या आपण निकालामध्ये व्यस्त आहोत. विद्यार्थ्यांची एवढी गर्दी आहे की, कोणाचे काय चूकले हे बघायला वेळ नाही.

ॲड. अनिल परब म्हणाले की, आता आमची प्राथमिकता निकाल लावणे ही असून ते मान्य आहे. कुणाचे काय चुकले, याचे पुनरावलोकन करावे लागेल.

याबाबत आपणांस समिती गठीत करावी लागेल. ऑक्टोबरच्या परिक्षेच्या वेळेला विद्यापीठ कोणती सिस्टीम राबविणार आहे, असा प्रश्न असून ज्या विद्यार्थ्यांना पोस्ट ग्रॅज्युएटमध्ये अँडमिशन घ्यायचे असेल व परिक्षांचे निकाल लावण्यास खुप विलंब होत असल्याने विद्यापीठातील ५७ हजार विद्यार्थ्यांचे पदवी परिक्षांचे निकाल अद्याप जाहिर झाले नसल्याने त्यांना पोस्ट ग्रॅज्युएटसच्या प्रवेशापासुन वंचित रहावे लागेल, अशी भिती त्यांनी व्यक्त केली. दरम्यानच्या काळात अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मात्र पोस्टग्रज्युएट मध्ये प्रवेश मिळेल व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. या विद्यार्थ्यांचे निकाल लवकर लावण्याची व पोस्ट ग्रॅज्युएटच्या जागा वाढविण्याची विनंती त्यांनी केली.

संचालक (परिक्षा व मुल्यमापन) म्हणाले की, या विद्यार्थ्यांचे निकाल लवकरात–लवकर लावण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

मा. कुलगुरु म्हणाले की, विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, यासाठी विशेष काळजी घेण्यात येईल.

मा. राज्यपाल देखील विद्यार्थ्यांच्या निकालास होणा–या विलंबामुळे अस्वस्थ असल्याची जाणीव करुन देत अँड. अनिल परब पुढे असेही म्हणाले की, निकालाबाबत विद्यापीठाशी संबंधित अनेक बातम्या प्रसार माध्यमांमध्ये प्रसिध्द होत आहेत व त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य विचारात घेवून प्राध्यापकांना विश्वासात घ्यावे, अशी विनंती त्यांनी केली.

ज्या २८,००० विद्यार्थ्यांचे निकाल अद्याप लागलेले नाहीत, त्यांच्या भवितव्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. किती गठ्ठे ट्रकमध्ये फेकण्यात आले, किती गठ्ठयातील उत्तरपत्रिका तपासल्या गेल्या, त्यात काही घातपात झाला का? या सर्व प्रकाराची माहिती सभागृहासमोर येणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या निकालाच्या तारखेत वारंवार होणा–या बदलांमुळे सभागृहात हक्कभंग आणावा लागल्याचे ते म्हणाले.

अँड. परब व श्रीमती खलिफे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत संचालक, (परिक्षा व मुल्यमापन मंडळ) म्हणाले की, वरील सर्व परिस्थिती केवळ तांत्रिक कारणांमुळे निर्माण झाली असून विद्यार्थ्यांचे प्रश्न तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना शून्य गुण किंवा अनुपस्थित दाखविले याचे मुख्य कारण जुन्या सॉफ्टवेअर व जुन्या प्रकारचे सिस्टीम आहे. विद्यापीठामध्ये ज्यावेळी निकाल प्रक्रिया करायला घेतो त्यावेळी शंभर पैकी दोन जणांचे निकाल राखीव (रिझर्व)

मध्ये ठेवायची असतात. अशा "आर. आर." मध्ये निकाल ठेवायचा आहे तिथे १०० पैकी दोघांना "ए.ए." केल्याशिवाय "आर. आर." होत नाही.

विद्यार्थी व पालकांना योग्य प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी परिक्षा विभागात हेल्प-डेस्क प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरु म्हणाले की, अनावधनाने विद्यार्थ्यांकडून उत्तरपत्रिकेवर योग्य प्रकारे बबलिंग न झाल्याने त्यांच्या उत्तरपत्रिका शोधण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात येत आहेत.

मा. कुलगुरु म्हणाले की, विद्यार्थ्यांना व पालकांना सहाय्य करण्यासाठी आणि परिक्षांचे निकाल लावण्यासाठी विद्यापीठाचे संपूर्ण प्रशासन प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असून लवकरात-लवकर विद्यापीठ यातून बाहेर पडेल. सन्मानीय सदस्यांचे यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य लाभत असल्याबद्दल कुलगुरुंनी त्यांचे आभार व्यक्त केले.

अॅड. अनिल परब यांनी परिक्षा विभागातील गोंधळाच्या परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांचे निकाल रिझर्व ठेवणे, हुशार विद्यार्थ्यांना शून्य गुण देणे, अनुपस्थिती दाखविणे, सॉफ्टवेअरमुळे असे घडत असल्यास त्यांची कारणे विद्यार्थ्यांना कळविणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी हेल्पडेस्क प्रभावी करणे, निकालाची गॅझेट प्रत महाविद्यालयांस पाठविणे, तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करणे, पुर्नमूल्यांकनाचे विविध प्रश्न, पुर्नमूल्यांकनासाठी शुल्क आकारणी, विधी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मिळालेले शून्य गुण व अंतर्गत गुण अयोग्य पध्दतीने देणे इत्यादीं मुद्दे उपस्थित केले व या गोंधळांमुळे विद्यार्थी व पालक हवालदिल झाले आहेत, असे ते म्हणाले. या संपूर्ण प्रकरणात नेमका घातपात कुठे झाला? याची माहिती प्रशासनाने द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. मुंबई विद्यापीठाची वृत्तपत्रातून बदनामी होत असल्याबद्दल ते म्हणाले की, विद्यापीठातर्फे होत असलेले सकारात्मक काम लोकांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे.

प्र-कुलगुरु म्हणाले की, कोड में नंबर गलत लिखा है। यह पेपर हम मिसप्लेस बता रहे है, जब तक स्टुडंट सामने नही आयेगा, हमें तब तक पता नहीं चलेगा। और ये जो कुछ केसेस है, वो करीब २,००० तक है।

अशा प्रकारे प्र-कुलगुरु व संचालक, परिक्षा मुल्यमापन मंडळ यांनी विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत अडचणी व त्रुटी यांची माहिती, किती निकाल लागणे बाकी आहे किंवा प्रवेशप्रकिया, उत्तर पत्रिका मिसप्लेसची उदाहरणे देवून अॅड. अनिल परब व श्रीमती हुस्नबानू खलिफे यांच्या प्रश्नांना उत्तरे देत येत्या काही दिवसात संपूर्ण निकाल जाहिर होतील, असे आश्वासन दिले.

परदेशात जाणा—या विद्यार्थ्यांसाठी हेल्पडेस्क मार्फत विशेष सहाय्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगीतले. विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवणे, हुशार विद्यार्थ्यांना शून्य गुण देणे, त्यांना अनुपस्थीत दर्शविणे, सॉफ्टवेअरमधील अडचणी, विद्यार्थ्यांशी निटपणे संवाद साधणे, निकालाची गॅझेट प्रत महाविद्यालयास पाठविणे, तक्रार निवारण यंत्रणा प्रभावीपणे राबविणे, पुर्नमूल्यांकन करणा—या विद्यार्थ्यांना अर्ज करण्याच्या कालावधीत सुट देणे व शुल्क आकारणी, विधी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांबाबत निर्माण झालेली परिस्थीती यासह अनेक मुद्यांवर विद्यापीठाने घेतलेल्या सकारात्मक निर्णयांची माहिती त्यांनी दिली. ॲड. परब व अन्य सदस्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

ॲड. अनिल परब म्हणाले की, बृहत आराखडयामध्ये मा. ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे अध्यासनासाठी मुंबई विद्यापीठास ५ कोटी रुपये मंजूर झाले असुन राज्य सरकारने विद्यापीठास एक रक्कमी ५ कोटी रक्कम दिल्यास त्यावरील व्याजातून अनेक कार्यक्रम राबविता येतील. यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेवून राज्य सरकारकडे एकरक्कमी ५ कोटी मागितल्यास त्याचा पाठपुरावा करण्यात येईल.

ॲड. अनिल परब यांच्या सुचनेस अनुसरुन कुलसचिव म्हणाले की, याबाबत शासनाकडे लवकरच विनंती करण्यात येईल.

सर्व उपस्थित माननीय सदस्यांचे विद्यापीठ प्रशासनातर्फे आभार व्यक्त करुन सन्माननीय सदस्यांनी परिक्षेसंबंधी किंवा विद्यापीठ प्रशासनासंबंधी अथवा बृहत आराखडयासंबंधी ज्या—ज्या सूचना सुचविल्या आहेत, त्याची विद्यापीठ प्रशासनाने नोंद घेतली असून, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे कुलसचिव म्हणाले. विद्यापीठावर आलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीतून बाहेर पडून विद्यापीठाची प्रतिमा कशी उंचावेल यासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करु, असे सांगून मा. कुलगुरुंच्या परवानगीने सदर सभा संपल्याचे कुलसचिवांनी जाहिर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई ४०० ०३२.
१६ फेब्रुवारी, २०१८

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ